# एक कुटुंब आपल्या घरात येशूची उपासना करते

मुलांसाठी कोणताही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, विश्वासणाऱ्यांनी लोकांना आपल्या घरात एकत्र जमवून त्यांना येशूविषयी सांगावे आणि तुझी उपासना करावी यासाठी त्यांना साहाय कर''.

**मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी** फिलिप्पै येथील बंदिशाळेच्या नायकाचा (तुरुंगाचा अधिकारी) वृतांत **प्रे.कृ. 16:22-36** मधून वाचा किंवा सांगा, यावरुन एक कुटुंब आपल्या घरात देवाची उपासना कशी करते हे पहायला मिळने.



वृतांत सांगून झाल्यावार, पुढील प्रश्न विचारा *(प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तर दिलेले आहे)*

- अमंलदाराने पौल व सीला ह्यांना कशी वागणूक दिली? *(वचने 23-24)*
- पौल व सीला मध्यरात्री तुरुंगात काय करीत होते? *(वचन 25)*
- तुरुंगाचा अधिकारी स्वत:चा घात का करुन घेत होता? *(वचने 26-27)*
- तुरुंग अधिकाऱ्यांचे व त्याच्या कुटुंबाचे तारण कसे झाले? *(वचन 31)*
- रात्री कोणत्या वेळेस तुरुंग अधिकारी व त्याच्या कुटुंबाने बाप्तिस्मा घेतला? *(चन 25 व 32-34)*

तुरुंगाचा अधिकारी आणि त्याचे कुटुंब ह्या वृतांताचे नाट्यीकरण करा,

- मुलांना ही छोटी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करुन घेण्यासाठी वेळ दद्या. तुम्ही सर्व भूमिक केल्या नाहीत तरी चालेल.
- मोठया मुलांनी लहान मुलांची नाटिकेसाठी तयारी करणात मदत करावी.
- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:

  **पौल.**

  **तुरुंगाचा अधिकारी.** दोन साखळया म्हणून तार आणि तरववारीसारखे दिसणारे काहीतरी जमा करा.

  **निवेदक.** वृतांताचा सारांश तयार करा. टेबलाच्या एका बाजूला दगड किंवा पुरुनके रचून ठेवा.
- **लहान मुलांनी** सीला, अमंलदार, तुरुंग अधिकारी आणि तुरुंग अधिकाऱ्यांचे कुटुंब ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक :** प्रे.कृ 16:22-28 मधून वृतांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''अमंलदाराचे म्हणणे ऐका.''

**अमलंदार :**''तुरुंग अधिकरी! पौल व सीला ह्यांना तुरुंगात ठेवा, त्यांना फटके मारा. आणि त्यांच्यावर कडक पहारा ठेवा।''

**तुरुंग अधिकारी :** त्यांचे पाय 'साखळयांनी' गुंडाळा (गाठी मारू नका) मग म्हणा, ''मी त्यांना तुरुंगात अगदी आतल्या कोठडीत बांधून ठेवतो आणि माझ्या जिवापाड त्यांचे रक्षण करीन''

**पौल व सीला :** टेबलाखाली बसून गाणी म्हणा।

**तुरुंग अधिकारी :**''भूकंप बापरे!'' (टेबल हालवा म्हणजे त्यावर ठेवलेली दगडे खाली पडतील)

**पौल व सीला :** 'साखळया' सोडून उभे राहा.

**कैदी :**''आम्ही आता मोकळे झालो! दारे तर उघडी आहेत!''

**तुरुंग अधिकारी:** तरवार उपसून म्हणा. ''हे काय झाले! कैदी तर मोकळे झाले. मी आता मेलेलेच बरे!''

**पौल :**मोठयाने ओरडा, ''थांबा साहेब! असा स्वत:चा घात करुन घेऊ नका आम्ही सर्वजण येथेच आहोत!''

**निवेदक :**प्रे.कृ. 16.28-33 मधून वृतांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''तुरुंगाचा अधिकारी काय म्हणतो ते ऐका!''

**तुरुंग अधिकारी :** ''अरे कोणीतरी दिवा आणा रे! मला पौल आणि सीला कोठे आहेत ते पहायचे आहे!'' मग पौल व सीला ह्यांच्यासमोर गुडघे टेकून बसा आणि विचारा ''माझे तारण व्हावे म्हणून मला काय केले पाहिजे?''

**पौल :** ''प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव म्हाजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल.''

**तुरुंग अधिकाऱ्यांचे कुटुंबिय:** ''आम्हांलाही येशूवर विश्वास ठेवायचा आहे''

**तुरुंग अधिकारी :**''या पौल भाऊ प्रथम मी तुमच्या जखमा स्वच्छ करतो आणि मग आजच रात्री आम्ही बाप्तिस्मा घेतो.''

**निवेदक:**प्रे.कृ. 16-34-38 मधून वृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा, ''तुरुंग अधिकारी पौल व सीला ह्यांना काय म्हणतो ते ऐका.''

**तुरुंग अधिकारी:** ''मी खूप आनंदात आहे, माझ्या कुटुंबातील सर्वांनी ख्रिस्तावर विश्वास ठेवून बाप्तिस्मा घेतला आहे. चला आपण सर्वजण घरी जाऊन जेवण करु या''.

**अमंलदार:**टेबलावर हाताने थाप मारुन म्हणा, ''सुप्रभात साहेब. तुम्ही पौल व सीला ह्यांना सोडून द्या.''


**तुरुंग अधिकारी:** ''बंधुजनहो, तुम्ही माझ्या कुटुंबियांना येशूची सुवार्ता सांगितली याबद्दल धन्यवाद शांतिने जा!''

**निवेदक किंवा मोठे मूल:** नाटिका संपल्यावर मदत करणाऱ्यां प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न:** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांनी प्रौढांना वर दिलेले प्रश्न विचारावेत.

**मुलांना विचारा:** आम्हांला कोणूयां प्रकारे आपल्या घरांमध्ये देवाची उपासना व सेवा करता येईल?

**चित्र काढा :**तुमच्या गावातील नमुनेदार घराचे साधे चित्र काढा. मुलांनी हे चित्र काढून मोठया माणसांना उपसनेच्या वेळी दाखववावे आणि आपल्याला देवाची उपासना घरात किंवा कोठेही करता येते हे सांगा.



**पाठ करा** योहाना 4:24

**कविता :** तीन मुलांना स्तोत्र 139:1-6 मधून प्रत्येकी दोन वचने म्हणायलां सांगा. प्रत्येक वचनानंतर ''कारण त्याची दया सनातन आहे'' हे वाक्य सर्वांना म्हणण्यास सांगा.

**मोठया मुलांना:** उपासनेसाठी घरांमध्ये एकत्र येण्याविषयी कविता किंवा गीते लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, आम्हांला तुझी कधीही आणि कुठेही उपासना करता येते. आमचा गट लहान असला तरी हरकत नाही. तू आमची सर्व कुटुंबे तुझ्याकडे आणल्याबद्दल धन्यवाद. आम्ही पूर्ण अंत:करणाने तुझी उपासना करावी यासाठी आमचे साहाय्य कर.''

***तुम्ही मुलांना शिकवत असाल आणी अद्याप पौल-तिमथी अभ्यास मुलांच्या शिक्षकांसाठी मार्गदर्शन A0b वाचले नसेल तर आता ते कृपया वाचा.***

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net